# होड्या / हेमंत गोविंद ओगळेकर



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४५९

REFBK-0023596
REFBK-0023596

संदर्भ काव्य
२७५१
२३५९६
५।८।८२

# होड्या

REFBK-0023596
REFBK-0023596

हेमंत गोविंद जोगळेकर

विजया राजाध्यक्ष यांची प्रस्तावना

श्री प्रकाशन

© हेमंत गोविंद जोगळेकर
हेमलता, ९१७/१९ सी.
फर्ग्युसन कॉलेज रोड
पुणे ४११ ००४

प्रकाशक : श्री प्रकाशन
ज्ञानेश्वर चंद्रशेखर आगाशे
पुणे ४११ ०३०

मुद्रक : मंदार प्रिंटर्स
शनवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ चित्रे : जयंत ताडफळे

ह्या ग्रंथास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळाने अनुदान दिले आहे.

मूल्य : रुपये १०

वडिलांच्या स्मृतीस...

अनुक्रमणिका




तेव्हां ना
होड्या
दरवाजा उघडाच असतो
ठ्ठो
कुर्र
जहाजे जेव्हां



तळ्यात... मळ्यात ..
कट्टी
फुलदाणी
का हसतेस ?
संदर्भखुणा
खिडकी



मोर सज्जच असतात
वारसा
रंग
डोंबाऱ्याचा खेळ



त्याची इच्छा
भाई हो
तिकिटचेकर
कपाट उघडताना



ती माझ्याकडे आली
काहीच आठवत नाही
कॅमेरे रोखलेले
बाग



अर्धे मिनिट
चित्र
त्या क्षणी
कुठून येतात

मला एकदा पंख फुटले होते
फुलपाखरासारखे
पण ते कुणाला कळलेही नाही
मग मी ते पंख कापून टाकले
बारीक बारीक तुकडे करून
हळूच वाऱ्यावर सोडून दिले
पण तेही कुणाला कळले नाही.



# तेव्हां ना

तेव्हां ना,
धूळ गवत आणि खडे माझ्या पायांना थेट गुदगुल्या करीत
आमचे सिंहासन तेव्हां पेरूच्या झाडावर होते
सगळ्या पानांची चव मला तोंडपाठ होती
सहज मी फुलाच्या आत हिंडून येत असे.
तेव्हां ना,
कपाटाच्या हिमालयावर मी समाधी लावून बसे
एकदा आकाशाचा घुमट उचलून मी बाहेर डोकावून पाहिले होते
नंतर पुन्हा तो जसाच्या तसा ठेवून दिला होता.
तेव्हां ना,
शिकवलेले सगळे कसे समजत असे ताबडतोब
सगळे रंग तेव्हां कसे छान वेगळे निघत असत
इतिहासातल्या सगळ्या राजांना मिशा असत.
तेव्हां ना, धनुष्यबाण घेऊन मी लढाईवर जात असे.
तेव्हां ना, मुठीमध्ये आईचे बोट बंद असे.

●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ...
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## होड्या

मला पुष्कळ होड्या येतात.
बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी

बिट्टू काहीतरी म्हणत होता
तो नेहमीच काहीतरी म्हणतो म्हणा
कॉफी तर सगळेच प्यायलो
ती चालवीत आली होती म्हणे गाडी.

बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी

बोलणं तर बोलायचंच असतं
सगळेच काय काय बोलत होते
माझ्याशी नाही, पण ती ही चिकार बडबडली
पुष्कळजण होते, मी बोललोच नाही काही.

बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी

चिंकू कुत्रा गोडीत होता :
आँव-याँव, इकडे धाव–तिकडे धाव,
तिच्याशी तर फारच गोडीत होता
ती ही भलतीच गोडीत होती.

बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी

दास अंकलनी मला विचारला
पहिलाच प्रश्न दुसऱ्या वेळेला :
मी सांगितलं म्हणा दोनदा

पण ती म्हणाली, ‘ पपा तुम्ही कमालच करता ! ’
बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी

कॉफी तर तिनंच दिलीन
तेव्हां मी नि गंधेकाका चेस खेळत होतो
फरसाण सुद्धा तिनंच आणलंन :
एकदा घेतलं, दुसऱ्यांदा नाही म्हणलो.
बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी

दारापर्यंत सगळेच गेलो,
ती ही म्हणाली, ‘ बराय अंकल, बराय आँटी
टाटा बिट्टू, टाटा चिंकू ’
नंतर म्हणालीच नाही काही.
बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी

पाऊस ना, पडलाच नाही
पाणी ना, वाह्यलंच नाही
होडया ना, सोडल्याच नाहीत
होडया ना, केल्याच नाहीत.

पण मला पुष्कळ होडया येतात :
बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी.

●

# दरवाजा उघडाच असतो

दरवाजा उघडाच असतो, कोणीसुद्धा येत नाही.

दाराच्या चौकटीत
आकाशाचा तुकडा,
तोच तोच डोंगर,
डोंगरावर झाडं
...हिरवळ बाजूलाच होती हिरवळ बाजूलाच...

दरवाजा उघडाच असतो, कोणीसुद्धा येत नाही.

दाराच्या आत
त्याच त्याच भिंती,
कपाटात कपडे,
तेलाची बाटली
पलंगावर पसरलेला 'मी' नावाचा मी

दरवाजा उघडाच असतो, कोणीसुद्धा येत नाही.

'मी' च्या आतमध्ये
तेच तेच रस्ते,
तीच तीच गाणी
गोल गोल राणी, एवढं एवढं पाणी
गोल गोल राणी, एवढं एवढं पाणी

...

दरवाजा उघडाच असतो
कोणीसुद्धा येत नाही.

●

## हो

आई म्हणाली, ' तुझं चित्त ठिकाणावर नाही. '
म्हणून मी जंगलात गेलो होतो.
पण तिथे ठिकाणावर नव्हते चित्त.
तशी, मी बसलो टेकून एका झाडयाच्या बुंध्याशी,
पहातो समोर तो एक परी :
पांढऱ्याशुभ्र झग्यातली
निळयाशार डोळयातली
लालचुटुक ओठातली...
' परी ' आली हाक.
पाहिले मी वळून कोण मारतो हाक ?
नव्हते कुणीच, तरी पुन्हा आली हाक :
' परी '
तेव्हा समजले मला, निघाली होती हाक माझ्याच गळयातून.
परी माझ्याकडे बघून हळूच हसली
(परी हसली ना, की तिचे पंख बारीक थरथरत रहातात)
परी हसली म्हणून मी पण हसलो
मग परी माझ्याजवळ आली
अन् आपल्या लांबसडक बोटांच्या चिमटीत
तिने पकडले माझे बरोब्बर मधले बोट.
आणि मला बरोबर घेऊन धावू लागली परी हसून
हसता हसता, तरंगत्या पावलांनी
येऊन थांबलो, तळयाच्या काठाशी

मी एकदम विचारलं, ‘ परे
तुझ्या मनात काय खरे ?’
परी एकदम गंभीर झाली
माझे बोट सोडून दिले
तेवढ्यात आला एक चित्ता

**‘ चित्ता ’**

आम्ही दोघेही म्हणालो आनंदून
लहानपणी ना, अशी एकच गोष्ट दोघांनी म्हटली
की डोक्यावर डोके आपटून ठो द्यायचो.
माझे डोके पुढे आले,
आठवत होते का परीला ते ?
पण तिचेही डोके पुढे आले
आमची डोकी पुढे पुढे
येत एकदम थांबली.
एकमेकांच्या बघत डोळ्यात
हळू हळू ठिकाणावर आली.
‘ ठ्ठो ’ चित्ता मोठ्यांदा ओरडला
आणि आपल्यालाच गोळी लागल्यासारखा धूम पळून गेला.
आई म्हणाली, ‘ तुझं चित्त ठिकाणावर नाही ’
म्हणून मी जंगलात गेलो होतो.

●

# कुरं

बाहेर जेव्हा पाऊस
पानापानाने भिजत होता
मी त्याला पाहिला
छोटयाश्शा पानावर बसून बासरी वाजवताना.

चालता चालता जेव्हां
मी वरच्या झाडीतून
आकाशाकडे पाहिले
तो माझ्याकडे बघून हसला
किरणांना धरून सुर्रकन् घसरताना.

ओळीमागून ओळी
—पानांमागून पाने
मी जेव्हां धावत चालल्लो होतो
मी त्याला ऐकला
माझ्याच कानात बसून कुरं करताना.

●

## जहाजे जेव्हां

पुढे अथांग समुद्र होता
आखलेली वाट नव्हती
दिशा सगळ्या खुणावीत होत्या
वारा साद घालीत होता
जहाजे जेव्हां पाण्यात माझी वाट पहात उभी होती.

सकाळची किरणे मला हाका मारून उठवीत होती
बागेतली फुले मुद्दाम माझ्यासाठी फुलत होती
निळ्याशार आकाशात ढगांचे गुच्छ होते
रात्र रोज माझ्यासाठी नवी स्वप्ने जागवीत होती
जहाजे जेव्हां पाण्यात माझी वाट पहात उभी होती.

अनोळखी गर्द झाडी मला भिववू धजत नव्हती
बसलेली जागा मला बांधून ठेवू शकत नव्हती
सगळेच मला पहायचे होते, सगळीकडे जायचे होते
सगळेच माझ्यासाठी होते, सगळे माझ्यसाठीच होते
जहाजे जेव्हां पाण्यात माझी वाट पहात उभी होती.

रस्ते मला घेऊन किती किती लांब फिरून येत
वळणे आणि डोंगरशिखरे आपल्याकडे ओढून नेत
समोरच्या खिडकीतून ती वळून वळून माझ्याकडे पहायची
जहाजे जेव्हां पाण्यात माझी वाट पहात उभी होती.

पुढे अथांग समुद्र होता
आखलेली वाट नव्हती
दिशा सगळ्या खुणावीत होत्या
वारा साद घालीत होता
डोक्यावरती माझ्या तेव्हां कोलंबसची टोपी होती
जहाजे जेव्हां पाण्यात माझी वाट पहात उभी होती.

●



संध्याकाळी कातरवेळी
पश्चिमेकडे बघत असताना
उडत उडत जाणारे
बगळे सगळे काळेच दिसतात
दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र
म्हशीम्हशींच्या पाठीवरचे
बगळे सगळे पांढरेच असतात.

## तळ्यात... मळ्यात...

पहिल्यांदा पाहिलं तुला :
वाटलं नव्हतं मला
आपली कधी ओळख होईल,
पण असेच समोरासमोर
येत गेलो वारंवार
अन् तू म्हणालीस,
'माझं नाव... ...
तुमचं नाव काय ?'

तळ्यात... मळ्यात...
तळ्यात... मळ्यात...

मग काय झालं की
भेटत गेलो पुन्हा पुन्हा,
काय काय बोललो आणिक
किती हसलो कारणाविना,
अन् तू म्हणालीस,

'आपण कसे भेटलो नाही या आधीच ?'

तळ्यात... मळ्यात...
तळ्यात... ... तळ्यात... ...
नंतर कशा कुणास ठाऊक
भेटी होत गेल्या विरळ
आणि जरी भेटलो तरी
शोधावे लागत विषय !
निरोपाचा शब्द तसा
उच्चारला कुणीच नाही
– पण असेच एकदा अचानक भेटल्यावर
आपण जेव्हां एकमेकांना म्हणालो,
'हलो'
तळ्यात... मळ्यात...
मळ्यात. मळ्यात.

●

# कट्टी

तुझ्याशी कट्टी होऊन आल्यावरही
हे काय होते
की मी फिरवीत रहातो हात
कल्पनेत
तुझ्या डोक्यावरून
माझ्या छातीवर विसावलेल्या.
डोक्यावरचा माझा हात
केसांतून फिरत जात
खांदा धरून थोपटतो
पोलक्याची कड धरून
मानेपर्यंत फिरत येतो
हनुवटी वर करून
गालावर बोटांनी चढतो.
हे काय होते
की भिजतात माझी बोटे
तुझ्या पापण्यांवरून फिरताना
तुझ्याशी कट्टी होऊन आल्यावरही.

## फुलदाणी

तू नेमाने लावतेस
आपल्या खोलीतल्या भिंतीवरल्या फुलदाणीत फुले.
रोज सकाळी न चुकता
पहिली फुले काढून टाकतेस
वेचक दोन फुले लावतेस
एकमेकांकडे तोंड करून
कितीतरी दिवसांपासून
बहुधा अगदी सुरुवातीपासून.

अलिकडे एक विलक्षण प्रकार घडतो
घडतो ? की मला तसा भास होतो ?
पण फुलदाणीतली फुले नकळत तोंड फिरवतात
दोन फुलांमधला कोन हळूहळू वाढत जातो.
हे मी तुला सांगितले नाही.

काल मध्यरात्री मला अचानक जाग आली
जाग येतायेताच डोक्यात फुलदाणीचा विचार आला
मी दचकलो. डोळे मिटून ठेवले
दिसू नये फुलदाणी समोरच्या भिंतीवरली म्हणून
तसेच डोळे मिटलेले ठेवून
मी हात लांब केला तुझ्या दिशेने–
तू
झोपलेली होतीस शांत
माझ्याकडे पाठ करून.

●

# का हसतेस ?

रात्री तू माझ्याजवळ झोपतेस,
सकाळी माझ्यासाठी न्याहारी बनवतेस,
मी ऑफिसला गेल्यावर
माझ्यासाठी डबा भरून पाठवतेस.

संध्याकाळी न चुकता
मी तुला फिरायला नेतो,
वाटेत कुणी भेटले तर
तुझी ओळख करून देतो,
'ही माझी पत्नी '
मग तू हसतेस.

का हसतेस ?
खरं सांग, का हसतेस ?

●

# संदर्भखुणा

तुझ्या अंगावरून फिरणाऱ्या माझ्या हातांना
मध्येच लागणारे थंड ठिपके...
मला आता त्यांची सवय झाली आहे
ते गेले आहेत बाहेर– माझ्या पृच्छेच्या
आणि आश्चर्याच्याही.
किंबहुना ते झाले आहेत संदर्भखुणा
माझ्या हाताची हद्द आखून देणाऱ्या

●

## खिडकी

खिडकी : नेहमीच कुतुहल चाळवणारी

खिडकी : वरून वेडावणारी

खिडकी : मिटल्या दारांमागून डोळा होऊन डोकावणारी

खिडकी : दोन्ही बाहू पसरून धावत येणाऱ्या अधीऱ्या वाऱ्याला
कवेत घेणारी

खिडकी : रस्त्याकडे पाठ करून आपल्या आत बुडून जाणारी

खिडकी : कपाळाशी हात घेऊन दूरवर रस्ता न्याहाळणारी

खिडकी : ब्रेक्सचा आवाज ऐकून डोळे मिटून घेणारी

खिडकी : घर शोधणाऱ्या चिवचिव चिमणीला आपल्या आत घेणारी

खिडकी : घाबरून उडणाऱ्या फडफड चिमणीला मुळी न सापडणारी

खिडकी : अचानक बोट उंचावून रस्त्याने ओवलेली दिव्यांची माळ
दाखवणारी

खिडकी : खालच्या झोपडीतल्या चुलीत जळणाऱ्या टायरचा वास घेत
रात्र रात्र जागणारी

खिडकी : गाडीतल्या एकाकी प्रवाशाच्या सोबतीला चंद्र देणारी
खिडकी : अंधाऱ्या रस्त्यात प्रकाशाचा चौकोन रेखणारी

खिडकी : आशाळभूत थाळीत एक पैसा फेकणारी
खिडकी : वरून नटून थटून केविलवाणे पहाणारी

खिडकी : मंद मंद गंध अलगद उचलून केसात खोवणारी
खिडकी : आपल्या चौकटीत इंद्रधनू पेलणारी

खिडकी : इतकी मुक्त की आकाश होऊन जाणारी
खिडकी : इतकी मुग्ध की लकेर होऊन गाणारी

खिडकी : घराला घरपण देणारी
खिडकी : आतल्या आत धुमसत चोराची वाट पहाणारी

खिडकी : बाहेर येता येता आपल्याच गजांना अडणारी
खिडकी : आत जाता जाता एक कवडसा मागणारी

खिडकी : खिडकीच
दारे : आपली आपल्या परी तिला मिटू उघडू पहाणारी

●

तुझ्याबद्दल
ओसंडून बोलणारे
विचारणारे लोक भेटल्यावर
मी नुसती हसते
तुला संपूर्ण सामावून घेतल्यागत.
त्यांना कौतुकच वाटेल, नाही ?
मी जर सांगितलं त्यांना :
तू गायला लावतोस मला
रात्र पावसाच्या आवाजाने
भरून गेल्यावर.

हे कळेल का कुणाला
फक्त तेवढेच माहीत आहे मला
तुझ्याबद्दल ?



# मोर सज्जच असतात

तसे मोर सज्जच असतात
संकेत मिळताच,
फुलवायला आपला पिसारा.

मी उघडते
तू दिलेला गोल जपानी पंखा
अन् सहजच टेकवते नाकावर
मग आपलं आपल्यालाच
सुचायला लागतं :
माझे डोळे
केवळ पंख्यामागून डोकावतात म्हणून
सूर्यच डोंगरामागून उगवणारे
अन्
मोरपिसाऱ्यावरचे असंख्य ठिपके :
डोळेच.

पंखा मिटवला की कसं सुटल्यासारखं वाटतं.
तसंच वाटतं का मोरांना आपला पिसारा मिटल्यावर ?

●

## वारसा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४५१
ग्रा. क्र. २३५९६
काव्य पातळ
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मला काहीच वाटलं नाही
पेरून ठेवताना फेंदारलेल्या मिशांचे नाकतोडे
तुझ्या भुरभुरणाऱ्या केसांआडून लकाकणाऱ्या डोळ्यांपुढे
उमटणाऱ्या अनेक निरागस वाटांवर;
मी करून ठेवली होती तरतूद तुझ्या सुरक्षित भविष्यकाळाची
की आपोआप उगवून येतील हवे तेवढे नाकतोडे
तुझ्या मनात उमलणाऱ्या वाटांसमोर
तुला रोखण्यासाठी.

मी बळेच खुपसत गेले माझे बोट, तुला नको असताना
रस्त्यावर दुडदुड धावताना फ्रॉकचा घेर पकडणाऱ्या तुझ्या हातात
आणि करून टाकली सवय वेळीच तुझ्या हातांना
चाचपडण्याची, दुसऱ्याचे बोट शोधीत.

मी नियमपूर्वक देत राहिले एक ठाशीव ' नाही '
पदर ओढीत तू हळूच केलेल्या प्रत्येक मागणीस
अन् मागे रेंगाळून रस्त्यात दुकानांच्या पायऱ्यावरून

उड्या मारीत खिदळणाऱ्या तुला केवढ्यांदा ओरडत गेले
तुझ्या मनावर दृढ संस्कार करेपर्यंत
की जे आपल्याला करावंसं वाटतं
ते शक्यतो करायचं नसतंच.

उशीर करून घरी आलेल्या तुला
मी सांगत राहिले
घराबाहेरच्या अंधारातल्या बागुलबुवांच्या गोष्टी
तुला स्वतःलाच बागुलबुवा दिसू लागेपर्यंत.

अन् जेव्हां मी खेकसले तुझ्यावर, दबलेल्या आवाजात
असं पाय फाकून न बसण्याबद्दल :
मी जवळजवळ पुरं केलं होतं माझं ऐतिहासिक कर्तव्य
तुला एक जबाबदार भेकड स्त्री बनवण्याचं
माझा सांस्कृतिक वारसा तुझ्यापर्यंत पोचवण्याचं.

●

## रंग

छातीत भरून घेतलेले
टाळयांचे पुन्हा पुन्हा झालेले कडकडाट
परत परत कानात घोळवीत
मी बसलेली असायची रंगपटात
सर्वस्व मिळाल्याच्या कातर आनंदात
माझ्या चेहऱ्यावरचे रंग पुसत.
रंग
जे चढविले होते मी कितीकदा
माझ्या चेहऱ्यावर निःशंक.
जे झगमगायचे झगझगीत प्रकाशात
खेचून आणायचे माझ्या हृदयातून
हर्ष, खेद, विविध भावप्रवाह
जे यायचे उसळत फेसाळत
भरून वहायचे लोटच्या लोट
लाटालाटांनी
दुथडी भरून समोरच्या जनसमूहाच्या मनामनांत
वाटावाटांनी.
रंग
मी पुसून टाकायची, पडदा सळसळत खाली आल्यानंतर
झगझगीत दिवे विझल्यानंतर
निष्काळजीपणे, रंग निघालाय का ते
समोरच्या आरशात पहात.
रंग
दिसेनासे होत माझ्या चेहऱ्यावरून
जमिनीवर उगवलेले गवत खुरपावे तसे

आणि माझ्या चेहऱ्याखाली
तसेच वाढत राही त्यांच्या मुळांनी केलेले अदृष्य जाळे
ज्यांची टोके घुसत गेली होती कूपनलिकेसारखी
थेट माझ्या हृदयापर्यंत
प्रकाशाचे झोत पडताच
माझा उपसा करण्यासाठी.
रंग
पुसून टाकताना आपल्याच कैफात
मी पूर्णपणे अज्ञानात
माझ्याच त्वचेखाली
रंगांनी पसरलेला जाळ्याचा आवळफास...
आज
हे कळतंय तेव्हां फार उशीर झाला आहे
पडदा पडलेला आहे
दिवे विझून गेले आहेत
गर्दी निघून गेली आहे.
मी माझ्याच घरकुलात
माझ्या माणसांसमवेत
येणाऱ्या लहानमोठ्या प्रसंगात
तहानेने व्याकूळ
ओंजळ पसरून
याचना करताना
माझ्याच चुळकाभर हर्षखेदासाठी
रंगांनी पसरलेल्या शोषवाहिन्यांकडे.
●

# डोंबाऱ्याचा खेळ

माझे पाय घाईघाईने चालले आहेत
बसस्टॉपकडे. पावणेदहाच्या बसचे वेध
तरीही माझ्या डोळ्यात शिरते रस्त्याकडेची
चालू असलेली खेळाची तयारी डोंबाऱ्याची :
उभारलेल्या काठ्या आणि दोर ताणलेला
जमू लागलेली पोरंटोरं. घुमू लागलेला
डोंबाऱ्याचा मजबूत हात ढोलकीवरला.
डोंबाऱ्याचा. मजबूत. हात.
डोंबाऱ्याचा. मजबूत.
डोंबाऱ्याचा.
ताल माझा पाठलाग करतो.
कानात शिरतो. डोक्यात चढतो.
अंगात भिनतो. पायात उतरतो.
ढुम् ढुम्क्क ढुम्
ढुम् ढुमक्क
ढुम्
ढुम् ढुमक्क ढुम्
ढुम् ढुमक्क
ढुम्
मी बसमध्ये उभी
एका हाताने वरचा दांडा घट्ट पकडून
दुसऱ्या हातात पर्स आणि छत्री सांभाळून.
बस धावते आहे.
ब्रेक लागला की मी पुढे झुकते
माझी छाती पुढच्या माणसाच्या पाठीला भिडते.
मी मागे झुकते

नितंबाशी मागच्या माणसाचा चुटपुटता हात.
मी पुढे झुकते. मी मागे झुकते.
जवळ येतातसे भासतात हात आणि पाठ.
मी पुढे झुकते– मी मागे झुकते–
मी तोल सांभाळते.
ढुम् ढुमक्क ढुम्
ढुम् ढुमक्क
ढुम्
ढुम् ढुमक्क ढुम्
ढुम् ढुमक्क
ढुम्

मी डिक्टेशन घेत्येय.
किंचित सरकलेला पदर
बॉसची निर्लज्ज नेमकी नजर
मी पदर सावरत नाही.
माझ्या लक्षात आलंय हे बॉसच्या लक्षात येतं
तो थांबतो.
अर्धं एक मिनिट माझ्या स्पीडचं कौतुक करतो
मग पुढे डिक्टेशन देतो.
वहीमध्ये माझी पेन्सिल कुरकुर करीत धावत असते.
मी टाइपरायटर समोर
अंगाभोवती पदर घट्ट लपेटून.
सवयीनं बोटं चाललेली
कट्ट कड कट्ट
कट्ट कड
कट्ट

डोक्यात घुमणारे नवऱ्याचे शब्द
बसक्या आवाजातले
नोकरीच्या पहिल्याच दिवशी सांगितलेले,
'साहेब असाही असतो
नोकरी करायची म्हणजे त्याला तोडता येत नाही
पण त्याला अधिक जवळ येऊ देता कामा नये.
शेवटी बाईलाच हा तोल सांभाळायचा असतो.'
ढुम् ढुमक्क ढुम्
ढुम् ढुमक्क
ढुम्
ढुम् ढुमक्क ढुम्
ढुम् ढुमक्क
ढुम्

रात्री अंथरुणावर पडेपर्यंत खूप उशीर झालेला असतो
नवरा हातातले मासिक मिटून माझ्याकडे तोंड करतो
चौकशी करतो ऑफिसची, बॉसची, सहकाऱ्यांची
साधेच प्रश्न पण सर्वांचा रोख मात्र नेमका असतो.
मग विषय बदलतो, नावं ठेवतो
बेताल वागणाऱ्या कुण्या बाईस.
माझ्या डोळ्यावर प्रचंड झोप. डोळे मिटू मिटू झालेले
तो आता कुरकुर करतोय माझ्या निरुत्साहाबद्दल
मला आठवतंय, कधीतरी त्यानं मला अधाशी म्हटलेलं.
मला झोप येत्येय,
मी हूं हूं करत्येय
त्याचे शब्द बुडून जातायत ढोलकीच्या आवाजात...
ढुम् ढुमक्क ढुम्

ढुम् ढुमक्क
ढुम्
ढुम् ढुमक्क ढुम्
ढुम् ढुमक्क
ढुम्
ढोलकी वाजत्येय– दोर ताणलेला
खाली जमलेली प्रचंड गर्दी वर पहाणारी
मी दोरावर उभी ! तोल सावरीत पुढे चाललेली–
दोराला अंत नाही !
खालचा जमाव उभा आहे माझ्याकडे हात पसरून गलका करीत
ढोलकीवाला चालला आहे माझ्याखालून ढोलकी वाजवीत.
मला दिसताहेत, त्याचे फक्त– चालणारे पाय,
ढोलकीवरला हात.
हात किती ओळखीचा
किती सवयीची त्याची हालचाल !
कुणाचा हात ?
मी थबकते, खाली पाहू लागते
माझा तोल जातोय
मी खाली पडत्येय
एकच क्षण दिसते वरचे निळे आकाश
माझ्यावर तुटून पडतात शेकडो माणसांचे हात
माझ्या अंगावर प्रचंड वजन
माझ्या तोंडून किंकाळीही फुटत नाही.
हातांच्या समुद्रात पुढे सरसावतात दोन हात
डोंबाऱ्याचे.
माझे दोन्ही स्तन आपल्या पंजांमध्ये घट्ट पकडतात.

ढोलकी वाजतेच आहे
भोवती उठलेला बीभत्स गलका–
अचानक आवाज थांबतात.
ढोलकी थांबते,
मी जागे होते.
माझ्या अंगावर नवऱ्याचे वजन
अंगाशी झटताहेत त्याचेच हात.
मी डोळे उघडत नाही
माझ्यात त्राण नाही
त्याला रोखण्याचं किंवा सहभागी होण्याचं.
मी सैल सोडते माझं शरीर त्याच्यासाठी
वेगळी काढते सगळी जाणीव शरीरापासून.
बुडवून टाकते डोक्यात पुन्हा
घुमू लागलेल्या ढोलकीच्या आवाजात
ढुम् ढुमक्क ढुम्
ढुम् ढुमक्क
ढुम्
ढुम् ढुमक्क ढुम्
ढुम् ढुमक्क
ढुम्

माझे पाय घाईघाईने चालले आहेत
बसस्टॉपकडे. पावणेदहाच्या बसचे वेध
तरीही माझ्या डोळ्यात शिरते रस्त्याकडेची
सुरू असलेली खेळाची तयारी डोंबाऱ्याची

●

केव्हापासून
पहात आलो होतो मी
घराबाहेर पडताना
ते दाराजवळ दिसणारे झुडूप
एखाद्या
पाळीव प्राण्यागत अंग मुडपून
केविलवाणे पहात बसलेले.
अन् येताजाता
टाकला होता वारंवार
एक करुणेचा
दृष्टिक्षेप त्याच्याकडे
भिकाऱ्याकडे भिर्कावलेल्या
नाण्यासारखा
त्यापलिकडे त्याचं काहीच
देणं लागत नसल्यासारखा.

अन् आज केवढा दचकलो मी
रात्रीच्या अंधारात
घराकडे परतताना
तेच झुडूप पाहून
एखाद्या दबा धरून बसलेल्या
श्वापदासारखे
माझ्या दारावर नजर रोखून



# त्याची इच्छा

दिवसभराचे काम करून थकल्यावरती
तुम्ही शिरू शकता तुमच्या नवऱ्याच्या कुशीत
त्याची इच्छा असेल तर,
त्याला झोप येऊन तो तुमच्याकडे पाठ करून झोपेपर्यंत.
पण त्याची इच्छा असेल
तर तुम्ही करू नका कंटाळा
कारण याची इच्छा असते तुम्हांला थोपटून तुमचा शीण घालवण्याची.

रात्री मध्येच तुमची छोटी उठल्यावरती
तुम्हीच उठा तुमची स्वप्ने थांबवून
आणि कपडे चढवून, थोपटा तिला ती झोपेपर्यंत.
पण ती तशीच रडत राहिली
तर तिला बाहेर घेऊन जा खेळवायला;
नाहीतर तुमच्या नवऱ्याची झोपमोड होईल
कारण त्याला जायचे असते दुसऱ्या दिवशी कामावरती.

तुमच्या मोठ्याची आन्हिके, शाळा, अभ्यास
खाणेपिणे, भांडणे सोडवणे झाल्यावरती
वेळ काढून तयार करून द्या त्याला भाषण : 'माझी आई'
कारण त्याची इच्छा असते व्यासपीठावरून तुमचा गौरव करण्याची.

पाहुण्यांचे खाणे, फिरणे केल्यावरती
थोडावेळ आवर्जून बसा हसून खेळून त्यांच्याशी
कारण त्यांची इच्छा असते तुमच्याशी बोलण्याची,
तुमचे कौतुक करण्याची.

रेशन, बाजारहाट, बँक, सौजन्यभेटी
नवऱ्याच्या पँटचे तुटलेले बटण शिवणे,
त्याच्याबरोबर नटून थटून अनोळखी पार्टीला जाणे
—आणि हे सगळे करून तुम्ही मुद्दाम काढा वेळ
तुमची सतार, भरतकाम किंवा लिखाणासाठी
कारण तुमच्या नवऱ्याची इच्छा असते
तुमचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्याची !

●

# भाई हो

भाई हो,
तो दूर एक ठिपका दिसतो ना
तिथे आपल्याला जायचंय,
सगळी तयारी झाली ?

ते नकाशे वगैरे तुम्ही घेताय खरे, पण
शेवटी ज्याची त्याची वाट उमटणार आहे
ज्याच्या त्याच्या पायाखालून.

ती दुर्बीण तुम्ही घेतल्येय तर असू दे
पण ती दाखवील एकच दृष्य, तिच्या भिंगातल्या आतले.

त्या तुमच्या सर्व प्रिय आठवणी
नीट बॅगेत ठेवा घडी करून
शक्य आहे, जाताना कड्यावरून
वाऱ्याबरोबर काही अलगद जातील उडून.
तुमच्या जवळच्या शब्दांच्या फौजेवर
भ्रमात नका राहू विसंबून
तुम्हीच भिऊ लागाल तुमच्या शब्दांना
अर्धे अंतर गेल्यावर चालून;
लागतील तसे म्हणून
वाटेतल्या ठेल्यांवरून
घेत चला नवीन शब्द– हलके वाटले तरी

तेच येतील आधाराला प्रसंग पडल्यावर.
हां, तुमची तत्त्वे वगैरे घेतलीत तरी हरकत नाही
ती कुठेही सहजी मिळतात बदलून.

तुमच्या जवळचे फुलांचे ओझे
आत्ताच शक्य तितके टाका कमी करून
ते बरे, नंतर देण्यापेक्षा फेकून, थकल्यावर वाहून वाहून.

एक सावधगिरीची सूचना :
वाटेतल्या नृत्यालयातल्या पोरींकडून
घेऊ नका उधार चुकून त्यांच्या पापण्यांतले पाणी.
ते घेईल वसूल करून तुमच्या हृदयातली सगळी गाणी.

भाई हो,
तुम्ही सर्वजण
इथेच विसरू पहाता आहात, पण
शेवटी तेवढेच रहाणार आहे ना तुमच्या सोबतीला ?
—तुमचे एकटेपण—

भाई हो,
त्या दूरच्या ठिपक्यापर्यंत आपल्याला जायचंय
सगळी तयारी झाली ?

●

## तिकिटचेकर

नोकरीच्या शोधात वणवण फिरताना
जाताना तसेच गाडीतून तिकिटाविना
काळीज धडधडतं पाहून कोणताही पांढरा कोट शिरताना.
तेव्हा वाटतं,
साली नोकरीच करायची तर तिकिट चेकरचीच का करू नये ?
ह्या दुनियेत, कुणीही उठावं, आपल्याला हटकावं ' तिकिट दिखाव '
अन् काळजानं धडधडावं कायम
विदाउट तिकिट जन्माला आल्यासारखं.
त्यापेक्षा,
आपणच का उभे राहू नये दरवाज्यावर, हातात चिमटा घेऊन ?
थांबवावं, त्या सर्व पावलोपावली अडवणाऱ्यांनाच
' तिकिट, तिकिट, तिकिट बताव '

पण तिकिटचेकरला तिकिट विचारता येतं त्यांनाच
जे बाहेर पडत असतात ह्या दरवाज्यातून.
त्यांचं तिकिट विचारता येत नाही
जे ह्या दरवाज्याबाहेर असतात,
जे पाय लावीत नाहीत
—धूळ कोळशानं भरलेल्या आगगाडीस.
आणि ज्यांच्यापाशी असतं अधिकृत तिकिट
कुठल्याही गाडीचं, त्यांना ते फार तर
काढायला लावता येतं खिशातून.
अडवता येतं फक्त त्यांनाच
—जे असतात आपल्यासारखेच रोजगाराच्या शोधात
पोटाचे सगळे मार्ग खुंटल्यावर जे धरतात

बम्बय चा अटळ रस्ता, उरली सुरली आशा रुळाला बांधून.
आणि जे परतत असतात गावाकडे, भ्रमनिरास झाल्यावर
डोळ्यात जपलेले गाव घर, तसेच– तिथेच असेल का याची चिंता करीत.
वैरागी, साधू, वैराग्याच्या वाटेवरचे
भुरट्या चोऱ्या करणारे, रस्ता चुकलेले, रस्ताच नसलेले
आणि अभागी एखादी डोळ्यात कोंडलेल्या आभाळबळावर
टपोरलेले पोट पेलणारी.
अनाथ, विकलांग भिकारी
फेरीवाले, हप्ता बांधलेले.
तिकिटचेकर झाल्यावर आपणही निढावून जाऊ
भिकाऱ्याच्या कटोऱ्यातून आपली अधेली उचलायला.
सलाम सुद्धा करू कुणा पैसेवाल्याला
बर्थ मिळवून दिल्यावर दोन रुपयाची नोट घेताना.
गाड्या येतील-जातील– माणसांना कुठे कुठे नेतील–
आपण तिकिटचेकर, तिथेच राहू कुठेही गेलो तरी
सरकदरवाज्याजवळ, दरवाज्याचाच भाग होऊन– सरकवून ठेवलेले.
आणि त्याबद्दल काही वाटण्याच्याही पलिकडे गेलेले.

असंच होतं सालं
विचार करताना.
मास्तरांचा मार खाताना आशा करायचो मास्तर व्हायची.
उरी फुटून इंटरव्ह्यू देताना
हेवा करतो टेबलाच्या त्याबाजूला बसलेल्यांचा.
चिरडले जात असताना टेबलाच्या ह्या बाजूस
स्वप्ने पहातो फक्त टेबलाच्या त्या बाजूस जायची.
हे टेबल...
हे टेबलच उलथून टाकता येईल
हे आपल्या मनातही येत नाही.

●

## कपाट उघडताना

कपाट उघडताना
निमिषार्धात वाटतं,
बाहेर येईल आत कोंबून ठेवलेल्या प्रेताचं मुंडकं
लटकत राहील त्याची थंड निश्चल नजर आपल्यावर रोखून.
आपण थोडेही विचलित होत नाही
कपाट उघडताना
आतून काहीच बाहेर आलं नाही तरी.
अन् करू शकतो उसकाउसक कपड्यांची
हवा तो कपडा मिळेपर्यंत.

तसं आपल्याला काही पण वाटतं
अक्षरशः काहीही.

आपण, भर लोकलमध्ये
केवळ नजरेने करतो संपूर्ण नग्न
समोर उभ्या कोणत्याही बाईस.

आपण, बायकोच्या एकटक डोळ्यात
खुपसतो आपली करंगळी सरळ
अन् कोरून काढतो बुबुळाच्या तळातला गर.

आपण, फेकून देतो

कडेवर बसून जागच्या जागी नाचणाऱ्या छबकड्यास
गॅलरीतून थेट गजबजलेल्या रस्त्यावर.

आणि दुसऱ्या क्षणाला
आपण, होतो नामानिराळे
एखाद्या कुशल जादुगाराच्या हातसफाईने
हे विचार
आपले, आपल्यातले नसल्याचे
आपल्यालाच पटवून देत.

कपाट उघडं असेपर्यंत
आपण निश्चित
चक्षुर्वैसत्यं खातरजमा असल्याने
कपाटात काहीच वावगं नसल्याची.

आणि दुसऱ्या क्षणाला
कपाटाचं दार बंद केल्यानंतर
आपल्याला कशाचीच खात्री देता येत नाही
—कितीही धडपड केली तरी
कपाटात कोंडून पडलेलं मुंडकं
आपलं स्वतःचंच नसल्याची सुद्धा.

●

आपण,
तुमच्या मागच्या अंगणात
एक पैसा पुरला होता
त्याचं काय झालं पुढे ?
की
तो तू कधीच उकरून टाकलास ?
धीर होत नाही मला
उकरून पहायला
न जाणो,
पैसा अजून तसाच असला तर ?



# ती माझ्याकडे आली

ती माझ्याकडे आली
आणि आपले हात माझ्या गळ्यात टाकत म्हणाली
'का रे असा गप्प एकटा बसून राह्यलाय्स ?'
'तू कुठे माझ्याकडे आलीस ?'
तिने चमकून माझ्याकडे पाहिले
म्हणाली 'ॲम सॉरी'
असाच एखाददुसरा क्षण गेला
कदाचित तिसरा चौथाही असेल
मग म्हणाली
'हे लोक ना फार वाईट आहेत
बघ ना, मला चिमटे काढताहेत
आय मस्ट गो'
आणि माझ्या गळ्यातले हात काढून
तिने माझ्याकडे पाठ फिरविली.

बँड आपला वाजतच होता.

●

# काहीच आठवत नाही

ही अजून दुपारच आहे का ?
अंगावरच्या पांढऱ्याधोप चादरीसारखी खरखरीत पसरलेली
आणि सुरकुत्यांतून लपून छपून सरपटत येणारे
हे औषधांच्या वासाचे सुस्कारे–
डॉक्टर यायची वेळ तर नाही झाली ?
नजर वळवावी तिकडे नुसत्या पांढऱ्या भिंती
पायगती तेवढी उंच उभी खिडकी
बाहेर लांब एका झाडाचा हिरवा तुकडा
भुर्रकन पक्षी उडून गेले–
आता झाड मोकळं होईल का ?
... ...
...कसला विचार करीत होतो मी ?
छे: ! काहीच आठवत नाही !
माझ्या चाचपडणाऱ्या हाताची बोटं कशी गेली या उशीवर
अथांग सावरीच्या कापसात असहाय बुडत ?
अन् बटण दाबल्यासारखा सुरू होतो पुन्हा आठवणींचा चित्रपट
टॅक्सीच्या खिडकीशी झुलणाऱ्या भरगच्च गजऱ्याचा घमघमाट
नेहमीचाच रस्ता अवेळी किती वेगळा वाटणारा
आणि तिच्यासाठी तो गजरा घेऊन जायची झालेली तीव्र इच्छा
घराचे दार कसे आपोआप उघडले
दिवाणखान्याने असे चमत्कारिक नजरेने माझ्याकडे पाहिले
समुद्राच्या लाटांचा आवाज कसा घरात फुटत असल्यासारखा
स्पष्ट

आतल्या खोलीत
निळसर चादरीवर ती पसरलेली
तांबुसगौर ज्योतीसारखी, वस्त्रांशिवाय
मी खिळल्यासारखा उभा
समुद्राच्या तशाच फुटत राहिलेल्या लाटा
लख्ख आठवते
माझी चाहूल लागून
उशीत बुडलेले डोके अर्धवट उचलून
तिने मारलेली हाक...
कोणती हाक ?
कोणती हाक ? कोणती हाक ?

...छे ! काहीच आठवत नाही !
काहीच आठवत नाही !
पण निघता निघत नाहीत
उशीत रुतत गेलेले माझे आवळलेले हात.
ही पांढरी चादर, पांढऱ्या भिंती, औषधांचे वास
मधूनच दिसणारे, नजर चुकवणारे परिचित चेहरे
तिच्या चेहऱ्याशिवाय.

आणि काहीच आठवत नाही
मस्तकात फुटत रहाणाऱ्या लाटांच्या आवाजाशिवाय.

●

# कॅमेरे रोखलेले

कॅमेरे रोखलेले आहेत
दिव्यांचे डोळे उघडलेले आहेत
लांबरुंद बेडवर निळ्या फुलांची चादर आहे.
...मागच्या शॉटला वेगळी चादर होती का ?

माझ्या समोरच्या आरशात
मी माझा चेहरा शोधतोय
मला माझा चेहरा सापडत नाही आहे.

मी प्रकाशाच्या वर्तुळाबाहेर
माझ्या दिशेने येणारा डायरेक्टर :

एक रुंदावत जाणारी सावली
त्याचा कानात सांगितल्यासारखा आवाज
'...बस इतनाही करना है
हिरॉइनका चेहरा अपनी तरफ घुमाना
और...'
मला माझा डायलॉग आठवत नाही आहे.
ती प्रकाशाच्या वर्तुळात
बेडवर बसलेली.
मी सावल्यांच्या समुद्रात
माझे हात घामाने चिकट झालेले
माझ्या खांद्यावर डायरेक्टरचा हात.

मी म्हणतो,
'आज तबीयत ठीक नही है'
...अन् बाणासारखी तिची नजर सणाणत माझ्याकडे येते.

'आजका शॉट एकदम आसान है.
सब रेडी है, पाच मिनटका काम है.'
डायरेक्टरचा खांद्यावरचा हात निघून गेला आहे

असिस्टंट मला डायलॉग सांगतोय
हातातली सिगरेट नुसतीच जळतेय
–दूर जळणाऱ्या नाइटलँपसारखा ठिपका

ती आता बेडवर पाठ करून झोपल्येय
माझ्या डोक्यात डायलॉगमधले अक्षर शिरत नाहीये
मघाशी किती पेग झाले ?
तीन ? की... बापरे !
तिच्या हातातल्या बांगड्या अस्वस्थ किणकिणताहेत
गळ्यातला सर कुठे गेला ?

कॅमेरा ? – रेडी !

साउंड ? – रेडी !

सीन फिफ्टिसिक्स, शॉट सिक्स
ॲक्शन !

मी भारल्यासारखा चालत बेडजवळ येतो
तिचा खांदा धरून तोंड माझ्याकडे वळवतो
बोटांना जाणवतो तिचा ताठर स्पर्श
ती आणि मी – झगझगीत प्रकाशाच्या बेडवर
कॅमेरा माझ्यावर रोखलेला
ती एकटक माझ्याकडे बघते आहे
तिच्या डोळ्यातून एकामागून एक शॉट उलगडताहेत

माझ्या ग्लासात व्हिस्की ओतणारा तिचा हात
मंद प्रकाशात
अन् काच किणकिणावी तसा तिच्या हसण्याचा आवाज
तिचे घर दाखवता दाखवता
बेडरूममध्ये
एकदम मला ओढून घेत ती पडली बेडवर
अंधुक प्रकाशात चमकणारा गळ्यातला मोत्याचा सर
... मी,
मी प्रयत्न केला
जमलंच नाही काही
अंधारच नुसता साकळत गेला
'मेरी... मेरी तबियत ठीक नही है, डार्लिंग'
ती ताडकन् कपडे अंगाभोवती लपेटत उठली
नुसत्या नजरेने तिने मला शिवी दिली
दूर जळणाऱ्या नाइटलँपचा एकाकी ठिपका.
'अ‍ॅक्शन !
अ‍ॅक्शन !!'
झगझगीत प्रकाशाच्या वर्तुळात मी उभा
तिच्यासमोर.
कॅमेरे रोखलेले
वर्तुळाबाहेर अंधारात माणसे उभी गोलाकार माझ्याकडे पहात
मी मरून पडतो
ति च्या पा या ज व ळ

●

## बाग

तसं घरानं लगेचच माझ्याशी जमवून घेतलं.
दिवसभर भणाणा भटकून
उशीर करून घरी आल्यावर
जड हातानं कुलूप उघडल्यावर
घर माझ्यासाठी हळुवार झालं.
बेडरूममध्ये एकटयानं झोपल्यावर
भिंती कधी नव्हत्या इतक्या आश्वासक झाल्या.
छत मला पटवून देऊ लागलं— काहीच न बिघडल्याचं.
तिच्या पसंतीने आणलेले कोच, ड्रेसिंग टेबल
तिने विणलेले उशांचे अभ्रे
कुणीच नंतर दुरावा धरला नाही.
स्वैपाकघरातल्या भांडयांनीही उगीच आठवणी उगाळल्या नाहीत.
तिने मुद्दाम माझ्यासाठी विणलेला स्वेटर
मी देऊन टाकला गुरख्याला.
तो मूर्ख, रोज तो घालून मला सलाम करू लागला
पण बरंच वाटलं मला तो स्वेटर त्याच्या अंगावर पाहून.

बागेचा मात्र मला कधीच भरवसा वाटला नाही
मी कटाक्षाने बंद ठेवली बागेत उघडणारी खिडकी.
खिडकीचं दार मी किलकिलं करायचो
फक्त भिरकावण्यापुरतं सिगरेटचं जळतं थोटूक
आणि त्याचवेळी फटीतून हळूच पहायचो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४५९
दा. क्र. २३५९६
काव्य प्रातळे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

बागेची होत जाणारी वाताहात.
सगळी जमीनभर पसरून विस्तारत राहिलेली झाडं
मला नाहीशी करायची होती
आणि पसरायचा होता चिरेबंद फरशीसारखा
सिगरेटच्या थोटकांचा गालिचा.
उन्हाळा वाढत गेला तशी झाडं सुकत गेली.
सर्वात आधी जास्वंदीच्या काड्या झाल्या.
सूर्यफुलाची झाडं आडवी झाली.
जाईचा वेल काळवंडत गेला
तरी अजून उभा होता.

सरत्या उन्हाळ्यात एक दिवस अचानक
आभाळ भरून आलं, सरसरून पाऊस पडला.
मी हादरलो, दुसऱ्या दिवशी
खिडकीच्या किंचितशा फटीतूनही स्पष्ट दिसणारी
जाईची एकाच पावसात हिरवी झालेली पानं पाहून.

पाऊस थांबलाच नाही नंतर
धडधडत्या काळजानं खिडकीच्या फटीला डोळा लावताना
मी खचत गेलो रोज
जमिनीत दबा धरून जिवंत राहिलेले
एकेक झाड बाहेर झेप घेताना पाहून.
ज्या दिवशी,

जाईच्या झाडाने निदर्यपणे उघडून दाखविल्या मला
अंगभर लगडलेल्या कळ्या
भूतकाळाच्या पटासारख्या,
मी गच्च बंद करून घेतली खिडकी.
तिच्या फटींवर कागद चिकटवले.
तरीही मला जाणवत राहिली
बाहेर भरारा वाढत जाणारी झाडं,
आख्खी जमीन व्यापून उगवून आलेलं रानटी गवत
दर दिवशी वीत वीत उंच वाढणारं,
आणि मला स्पष्ट ऐकू येत राहिले– स्वतःच्या श्वासाइतके
गवतात सरपटणाऱ्या जनावरांचे फूत्कार.

मला भय वाटतं
एक दिवस हे गवत खिडकीपर्यंत वाढेल
खिडकीच्या फटीतून, कागद फोडून, घरात घुसेल
आणि मग ह्या घराचाही भरवसा रहाणार नाही.
हातपाय पोटाशी घेऊन पलंगावर बसून राहल्यावरही
मला स्वतःचाही भरवसा वाटत नाही.
मी घाबरतो सोडायला स्वतःचेच निश्वास
वाटतं बाहेर येईल श्वासाबरोबर कोणत्याही क्षणी
आपल्याच फुप्फुसात घुसून बसलेला साप.

●

तुझ्या चित्रातला
गर्द निळा रंग

मी पहातो
देत चालताना ठिपके
माझ्या पावलांचे जमिनीवर
अचूक मोजता येतील अशा अंतरांवर
माझ्या पोतडीत कसलेले रंग
आणि कितीतरी दूरपर्यंत
माझ्या सांभाळून ठेवलेल्या रेषा
मला कसे तुझ्या चित्रात
शिरता येईल ?

तुझे तर अनिर्बंध आकाश
आणि तुझे
अगदी स्वतःचे हात.



# अर्धे मिनिट

आत्ता मी उभा आहे
एस्टी स्टँडवरच्या मुतारीत
अशा इतर कुठल्याही ठिकाणी असेल
असा उग्र दर्प इथेही आहे
पण माझे लक्ष आता तिकडे नाही.
माझ्यासमोरच्या झरोकेवजा खिडकीतून
बाहेर दिसतोय कसल्याशा कुंपणाचा पत्रा,
गर्द हिरवा रंग लावलेल्या पत्र्याच्या
नागमोडी काठावर बसलाय एक कावळा.
कावळ्याचे अंग भिजल्येय
त्याच्या डोक्यावरची लवही विस्कटलेय.
इथून दिसणारा त्याचा एकच डोळा
तोही दिसतोय पाण्यात तरळलेला.
आपले पंख, थोडे उचलून,
फुगवून, त्याखाली अंग चोरून
तसाच बसून राह्यलाय कावळा
इथे भुरभुरणाऱ्या पावसात.
आणखी अर्ध्या मिनिटानंतर मी इथे नसेन.
तरीही मी तिथेच असेन.

●

# चित्र

मी मागितलं म्हणून
तुम्ही दिलं होतंत काढून
माझ्या वहीत चित्र :
' माझ्या खोलीसमोरचे दृष्य '

मी पहात होतो एकटक
तुमच्या शेजारी उभा राहून
तुमच्या पेन्सिलीतून झरझर निघणाऱ्या ठाम रेषा–
पुढच्या दरवाजाची चौकट
पारिजातकाची वाकलेली फांदी
विजेचा खांब
कुंपण, न दिसणारा रस्ता
रस्त्यापलिकडे पसरलेले शेत
आणि त्याही पलिकडे उरलेल्या जागेत
काही न काढताच
आगांतुक येऊन उभे राहिलेले आकाश ..
तुम्ही अचानक निघून गेलात
चित्रापलिकडे.
मी चित्राच्या अलिकडे, अध्याहृत.
मधे उरलेले हे चित्र
अपारदर्शक
आपल्या द्विमितीत अनंत पसरलेले

●

## त्या क्षणी

मरणघटिका जवळ आली की अचूक
मी येऊन पडेन तुझ्या दाराशी दूर देशातल्या
देवदासासारखा.

ग्लानीने जाणीव धूसर होत जाईल
वेदनांच्या कळा उत्कट होत जातील
भरतीच्या लाटांसारख्या.
बंद दारापलिकडे तू असशील
तुझ्या दैनंदिन उद्योगात
—नवऱ्याचा कोट शिवीत
देवापुढे दिवा लावीत
किंवा तू दिला असशील तुझा पाझरणारा स्तन
तुझ्या तान्हुल्याच्या तोंडात
तुला अंधुकसेही वाटणार नाही स्वप्नातसुद्धा
मी असेन असा इथे पडलेला तुझ्या दारासमोर.

थंड काळोख दाटत जाईल.
वेदनेच्या प्रत्येक लाटेबरोबर उंच जाताना
मी घेतला असेल एकच ध्यास माझ्या सर्वस्वानिशी
जो इतके दिवस अज्ञात माझा मलाच
राहिलेला खोल मनाच्या तळात.
मी मिटलेल्या डोळ्यांनी
वाट पहात राहीन
दार उघडण्याची.

कदाचित दार उघडून तू माझ्याकडे येशील
कदाचित दार उघडून मृत्यू माझ्याकडे येईल
त्या क्षणी तुम्ही दोघेही माझ्यासाठी एकच झालेला असाल.

●

## कुठून येतात

कुठून येतात तुझ्या कवितलेले शब्द ?
दूरहून उडून येणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे
अचानक तरीही अटळ
त्यांनी पंखांवरून आणलेले आकाश...
मी भ्रमचित्त धुंडत रहातो दिशा
–ते आले जिकडून·
दाट जंगल
झाडे एकमेकात इतकी मिसळलेली
की समजत नाही कोणती फांदी
–तुझी, माझी, किंवा कुणाचीच नसलेली.
मी वेगळा करू शकत नाही मला
या दिशांपासून.
पंख फडफडून टाकले
की संपते का कविता तुझ्यापुरती ?
माझ्यासाठी ठेवून न संपणारे आकाश...

•

## कुठून येतात तुझ्या कवितेतले शब्द ?

**—विजया राजाध्यक्ष**

कवीने अनेक कविता लिहिल्या तरी त्यांतील फार थोड्या कवितांनाच त्याच्या निर्मितीत मध्यवर्ती स्थान असते. या मध्यवर्ती कवितेत कवीचे अवघे अनुभवक्षेत्र, त्याची आविष्कारशैली, काव्यदृष्टी यांचे जवळजवळ संपूर्ण, एकसंध प्रतिबिंब असते. याप्रकारच्या कविता कवी आपल्या काव्यप्रवासाच्या कोणत्या टप्प्यावर लिहील हे सांगता येणार नाही. पण अशा कविता त्याच्या हातून लिहून होणे हे त्याला स्वतःचा सूर सापडल्याचे लक्षण आहे असे मात्र निश्चितपणे म्हणता येईल. कोणाला तो सूर लवकर सापडतो, कोणाला उशिरा; कोणाला अखेरपर्यंत सापडतच नाही; कोणाच्या कवितेत तो आधी सापडल्यासारखा, आणि नंतर हरवल्यासारखा वाटतो. अशा अनेक तऱ्हा.

यांपैकी हेमंत जोगळेकर यांची तऱ्हा कोणती ? मला वाटते, पहिली. याअर्थाने ते बालकवींच्या कुळातले आहेत. त्यांचे बालकवींशी आणखी काही दुवेही आहेत. त्यांच्या कवितेत जणू बालकवींच्या निरागस, कोवळ्या मनाचा पुनर्जन्म आहे; आणि हा कोवळेपणा दुबळेपणापासून फार दूर आहे. याचा प्रत्यय जिला जोगळेकरांची मध्यवर्ती कविता म्हणता येईल, अशा पहिल्याच कवितेत येतो :

मला एकदा पंख फुटले होते
फुलपाखरासारखे.
पण ते कुणाला कळलेही नाही.
मग मी ते पंख कापून टाकले
बारीक बारीक तुकडे करून
हळूच वाऱ्यावर सोडून दिले.
पण तेही कुणाला कळले नाही.

ही 'कविबाळे'चीच कहाणी तर नव्हे ? आठवण व्हावी एवढे साम्य आहे, यात शंकाच नाही. पण या कवितेत 'कविबाळे'तील नियती-वादी सूर नाही. पंख स्वतःच कापून टाकले ना ? यात नियतीचा संबंध आलाच कुठे ? म्हणून मग तिला जाब विचारणे वा तिला 'सहिष्णुता अचल अन् निःशब्द' हेच उत्तर देणे, हेही नाही. ते मर्ढेकरांनी केले. तो पोकळपवित्रा नव्हता, हे त्यांच्या नंतरच्या कवितांनी सिद्ध केले. जोगळेकरांच्या कवितेला एवढा खंबीरपणा, सध्या तरी, झेपला नसता ! पण त्या खंबीरपणाचे काही पर्याय त्यांच्या कवितेत दिसतात. या अर्थाने जोगळेकर मर्ढेकरांच्या कुळातलेही आहेत. हे जणू मर्ढेकरी युगात जन्मलेले व वाढलेले बालकवीचे मन आहे. यात विसंगतीचा प्रश्न येत नाही. कारण अखेर मर्ढेकरही बालकवींच्याच कुळातले ना ? आजच्या काही तरुण कवींची कविता ही मर्ढेकरांचा वारसा सांगणारी कविता आहे; जोगळेकरांची कविता ही बालकवींना सामावून घेतलेल्या मर्ढेकरांचा वारसा सांगते, हे तिचे वेगळेपण. ते या मध्यवर्ती कवितेत उमटले आहे. जोगळेकरांच्या काही कवितांत फुटलेले पंख दिसतात, आणि काही कवितांत, त्यांनी स्वतःच कापलेल्या पंखांचे 'बारीक बारीक तुकडे' सर्वत्र भिरभिरतात. पण एवढेच घडत नाही. आणखी एक विलक्षण गोष्ट घडते. 'ते कुणाला कळत नाही.' कारण इतरांना कळावे असा उद्देश नाही. मग ते कळते कसे ? किती ? काय ? या प्रश्नांची उत्तरे सापडणे म्हणजे वाचकाने सोडलेल्या 'होड्या' दुसऱ्या काठाला पोचणे. आधी त्या सोडून तर पाहू !

'तेव्हा नां', 'ठ्ठो', 'जहाजे जेव्हां' यांसारख्या कवितांत ज्या वयात पंख फुटत होते, त्या वयाची स्मरणे आहेत. तेव्हाचे आयुष्य एखाद्या सुंदर स्वप्नासारखे होते. शब्दस्पर्शरूपरसगंधाच्या संवेदना कशा तीव्र होत्या ! कोठे गुंतागुंत नव्हतीच. सगळे थेट मनाला येऊन भिडत असे. आधार होता, म्हणून जिद्द होती.

तेव्हां ना, धनुष्यबाण घेऊन मी लढाईवर जात असे.
तेव्हां ना, मुठीमध्ये आईचे बोट बंद असे.

आयुष्याला अनंत शक्यता होत्या. कोठेही जावे. सगळेच आपली वाट पाहत थांबलेले, साद घालणारे. 'कोलंबसाची टोपी' घालून अनोळखी प्रदेशांचा शोध. तसा एकच काय, अनेक प्रदेश सापडतील हा विश्वास. डोके ठिकाणावर नसले की सरळ जंगलात. तेथे सहजपणे परी भेटायची. कधी एखादा चित्ताही. पण त्याची भीती वाटत नसे. उलट तोच 'ठ्ठो' असे मोठ्यांदा म्हणून 'आपल्यालाच गोळी लागल्यासारखा धूम पळून' जायचा. या तीन कवितांतील प्रत्येक तपशील आपले तपशीलपण ओलांडतो; कधी भावच्छटांत, तर कधी प्रतिमांत रूपांतरित होऊन, बालपणाचा मूड पकडतो. त्या भूतकाळाबद्दल बोलताना तो हरवल्याची, चित्र बदलल्याची कळही हळुवारपणे उमटते. या कविता एखाद्या पारदर्शी जलप्रवाहा-सारख्या आहेत; आणि मुख्य म्हणजे त्यांचा संदर्भ घेऊनच कवी व त्याची कविता यांची वाढ झाली आहे. विशेषत: 'ठ्ठो'सारख्या कवितेतील 'भ्रांतचित्त' अवस्था, तिच्यातून निर्माण होणारी फँटसी, हे सगळे जोगळेकरांच्या कवितेत टिकून राहिले आहे. या तऱ्हेची संपृक्तता आजच्या किती कवितांत दिसते ? ते कवितेच्या गुणवत्तेचे एकमेव लक्षण अर्थातच नाही. पण आजच्या काही कवींकडून 'अव्यवस्थित'पणाचे जे तत्त्वज्ञान बनविण्यात येते, ते कशासाठी ? सुदैवाने, जोगळेकरांवर तो प्रसंग आलेला नाही.

कविता सरळ पुढे सरकते आणि वाढाळू वयाच्या आठवणींपर्यंत पोचते. 'बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी' अशा सर्वप्रकारच्या होड्या करण्याचे वय. या वयात स्त्रीबद्दल वाटणारे संदिग्ध, अनोखे, स्वत:लाच नीटसे न उमगणारे आकर्षण. एका प्रसंगनिवेदनातून, त्यावेळी झालेल्या संवादातून, त्यासंबंधीच्या प्रति-क्रियांतून, जोगळेकरांनी ते आकर्षण किती ताजेपणाने, अव्याजपणाने शब्दांकित केले आहे ! 'होड्या'मधील ती प्रत्यक्षपणे बोलली नाही. 'तळ्यात ..मळ्यात'मध्ये तिच्याशी वरवरचे बोलणे झाले; त्यातूनच हळूहळू नाजुक संबंध जडले. पण तरीही अनिश्चितता राहिलीच. औपचारिकपणा वाढतच राहिला. 'कट्टी'मध्ये थोडे वेगळे घडते.

बंध दृढ झालेले असतात : 'कट्टी होऊन आल्यावरही' तिच्याच आठवणीत रेंगाळण्याइतके, तिच्या डोळ्यांतील पाण्याने बोटे भिजण्याइतके. या तिन्ही कवितांना स्वप्नाळू सूर आहे. तो सांकेतिक किंवा कृत्रिम वाटत नाही. कारण त्याला कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा संदर्भ आहे.

आणखी एक अधिक महत्त्वाचे कारण आहे : जोगळेकरांनी वाढाळू वयाचे चित्र प्रेमानुभवापुरतेच मर्यादित ठेवलेले नाही. या वयाची सरहद्द ओलांडत असतानाच कधीतरी नोकरीचा शोधही करावा लागतो. तो एका वेगळ्या जगात केलेला प्रवेश असतो. भोवतीचे जग बदलले की मनातले विचारही बदलतात. त्या विचारांतून जोगळेकरांच्या कवितेला नव्या दिशा फुटतात. 'पाऊस ना, पडलाच नाही; पाणी ना, वाह्यलंच नाही' या प्रवाहाला

उरी फुटून इंटरव्ह्यू देताना
हेवा करतो टेबलाच्या त्या बाजूला बसलेल्यांचा
चिरडले जात असताना टेबलाच्या ह्या बाजूस

हा प्रवाह येऊन मिळतो. कवितेचे पात्र आपोआपच रुंदावते. त्याच्या अगदी तळाशी वैफल्याचा थर असतो. हे वैफल्य वैयक्तिक तसे सामाजिक आणि आधुनिक जगाचा संदर्भ असलेलेही. या जगाच्या व्यवहाराविषयी कवी संयत, संथ सुरात भाष्य करतो. 'होड्या' व 'तिकिटचेकर' यांना जोडणारा दुसरा दुवा स्वप्नरंजनाचा आहे; तिसरा दुवा संकोची, समतोल स्वभावाचा. म्हणूनच 'टेबलाच्या ह्या बाजूस' बसून फक्त 'त्या बाजूस' जाण्याची स्वप्ने पाहायची. कवी प्रामाणिक कबुली देतो,

हे टेबल ..
हे टेबलच उलथून टाकता येईल
हे आपल्या मनातही येत नाही.

हा भ्याडपणा नव्हे; स्वतःच्या मर्यादांची जाणीव आहे. आजच्या पुष्कळशा कवितेत ती अभावानेच आढळणारी आहे, आणि म्हणून अधिक लक्ष वेधून घेणारी आहे.

वैफल्याच्या अनुभवाला अधिक प्रत्यक्षपणे भिडणाऱ्या ‘ बाग ’ व ‘त्या क्षणी ’ या कवितांचा विचार येथेच करता येईल. ‘त्या क्षणी ’ या कवितेतही स्वप्नरंजन आहे– पण ते किती वेगळे ! मनात रुतून राहिलेल्या एका अपूर्ण नात्याचा, त्यातून जन्मलेल्या मूक दु:खाचा अंत कसा असेल यासंबंधीचा तो एक तर्क आहे. यातून आयुष्यात दाटून राहिलेल्या उदास अभ्रांची सूचना मिळते. मनात एक प्रकारची अनिश्चितता आहे. कोण आधी येईल ? तू की मृत्यू ? आणखी एका कवितेत, ‘ खूप मागे तुझ्या अंगणात पुरलेल्या पैशाचे काय झाले असेल ?’ असा प्रश्न आहे; आणि ‘ न जाणो, पैसा अजून तसाच असला तर ?’ ही भीतीही आहे. याचा अर्थ जुन्या आठवणी नामशेष व्हायला हव्या आहेत, असाही नाही. ‘ बाग ’मध्ये त्या आठवणी जपल्या आहेत. त्या जपणाऱ्या घराच्या सहवासात कवीला सुरक्षित वाटते. घराबाहेरील बागेचा मात्र त्याला भरवसा वाटत नाही. सुरुवातीला ती बाग उजाड आहे, पण नंतर हळूहळू ती नव्याने बहरत चालली आहे. त्या बहराची भीती वाटते.

ज्या दिवशी
जाईच्या झाडाने निर्दयपणे उघडून दाखविल्या मला
अंगभर लगडलेल्या कळ्या
भूतकाळाच्या पटासारख्या;
मी गच्च बंद करून घेतली खिडकी.

हा बहर घरात घुसला तर ? त्यामुळे घरही आपले राहिले नाही तर ? आपले दु:खही निसटून बाहेर आले तर ?

या काही कवितांवरून लक्षात येते की जोगळेकरांच्या कवितेतील विफलता, उदासीनता संमिश्र आहे. तिला एकारण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला नाही. कधी ती अनामिक आहे, कधी तिला एखादा संदर्भ आहे; कधी ती हवी आहे, कधी नको आहे, कधी तो अनुभव जागरुकपणे घेतला आहे, कधी भ्रांतीत. हे सगळे बालकवींच्या कवितेतही आहे. फुटलेले पंख आणि तुटलेले पंख. हे केंद्र. एका अर्थाने हे

या दशकातील एका ' बालविहगा 'चेच आत्मचरित्र नाही का ?

' बालविहग 'मध्ये नुसती उदासी नाही. त्या उदासीसकट स्वतःला, आयुष्याला भिडणे, वस्तुस्थितीचे भान येणे हेही आहे. या बाबतीतही जोगळेकर बालकवींशी नाते जुळवितात. त्यांनी स्वतःच्या मनात दडून बसलेली अपूर्णता, भीती, विकृती, एकटेपण यांचे संमिश्र चित्र ' झुडूप ', ' कपाट उघडताना ', ' भाई हो ' यांसारख्या काही कवितांत रेखाटले आहे. मनाचे गुणधर्म तेच आहेत; कालानुरूप प्रतिमा वेगळ्या, इतकेच. अनुभवाशी एकजीव झालेले चिंतन. त्याचा साधा, संदर्भ-विरहित आविष्कार. जडजंबाल तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न कोठेही नाही. पण त्याची आवश्यकताच राहत नाही. या प्रांजळ अनुभवकथनात प्रत्येकाला भिडावे, पटावे असे काहीतरी असतेच. ते आत्मसात करण्यासाठी कोणताही जाणीवपूर्वक प्रयत्न करावा लागत नाही.

तुमच्या जवळचे फुलांचे ओझे
आताच शक्य तितके टाका कमी करून
ते बरे, नंतर देण्यापेक्षा फेकून, थकल्यावर वाहून वाहून.

या ओळी सहजपणे येऊन पोचतात. संवाद राहतो, पण वक्तृत्व टळते. जोगळेकरांच्या ' खिडकी ' या कवितेलाही चिंतनाचा स्पर्श आहे. खिडकीच्या एकेका रूपात आयुष्याचेच एकेक रूप सामावलेले आहे. तेथेही भीती, एकटेपण, असुरक्षितता हे सगळे आहेच. कोणाही संवेदनाक्षम व्यक्तीच्या मनात रुतून बसलेल्या या भावना असतात. भाषेला त्या संवेदना टिपता येतात की नाही, एवढाच प्रश्न असतो.

कालानुरूप प्रतिमा वेगळ्या आहेत असे वर म्हटले. आणखी थोडे वेगळेपणही आहे. उदाहरणार्थ खालील काही ओळी पहा :

खिडकी : खालच्या झोपडीतल्या चुलीत जळणाऱ्या टायरचा
वास घेत रात्ररात्र जागणारी

आपण फेकून देतो
कडेवर बसून जागच्याजागी नाचणाऱ्या छबकड्यास
गॅलरीतून थेट गजबजलेल्या रस्त्यावर

तिकिटचेकर झाल्यावर आपणही निर्ढावून जाऊ
भिकाऱ्याच्या कटोऱ्यातून आपली अधेली उचलायला
सलामसुद्धा करू कुणा पैसेवाल्याला
बर्थ मिळवून दिल्यावर दोन रुपयाची नोट घेताना.

असले काही बालकवींच्या कवितेत येऊच शकत नव्हते. या तपशिलांमागे असणाऱ्या अनुभवांना मर्ढेकरांनी कवितेत प्रवेश दिला. त्यांचे बटबटीत अनुकरण अनेकांनी केले. आणखी भडक तपशील देऊन, काहीवेळा मर्ढेकरांवर मातही केली. पण संवेदनेशिवाय आलेल्या तपशिलांना काय अर्थ ? जोगळेकरांच्या कवितेत जाणवते ती मर्ढेकरांची संवेदनाशक्ती. तिच्यात बालकवी अंतर्भूतच आहेत.

जोगळेकरांच्या या कविता वाचताना आणखी एक गोष्ट जाणवते. त्यांनी या अनुभवविश्वात मर्ढेकरांनी उघडलेल्या प्रवेशद्वाराने पाऊल टाकलेले असले तरी कवितेच्या भाषेचे दार काहीवेळा पु. शि. रेग्यांनी उघडलेले आहे. ‘ खिडकी ’, ‘ भाई हो ’ इत्यादी कवितांना रेग्यांच्या शैलीची झाक आहे. रेगे अधूनमधून अशा संवादशैलीत लिहितात; आकड्यासारखी एकेक ओळ लिहून शेवटी त्या सगळ्या आकड्यांची बेरीज करणारी ओळ लिहितात. ही रेग्यांची एक शैली. दुसरी फार बांधीव, मिताक्षरी –तिचीही झाक जोगळेकरांच्या ‘ मोर सज्जच असतात ’, ‘ तुझ्या चित्रातला गर्द निळा रंग ’ वगैरे कवितांत आहे. हा संस्कार केवळ शैलीपुरताच मर्यादित आहे असेही नाही. तो खोलवर झिरपलेला आहे. रंग, रेषा, चित्र हे रेग्यांचे अनुभव होते. आणखी पुढे जाऊन असे म्हणता येईल की ‘ होड्या ’मधील वाढाळू वयातील प्रेमानुभव, स्त्रीविषयक कविता या सगळ्यांनाही रेग्यांचा स्पर्श आहे. रेग्यांनी जाणलेले, पण व्यक्त न केलेले असे स्त्रीचे रूप जोगळेकरांनी दाखविले आहे. ते मर्ढेकरांनी जाणले होते; आणि व्यक्तही केले होते– रेग्यांनी व्यक्त केलेले रूप मनोमन जाणून. असा हा जोगळेकरांच्या कवितेतील रेगे-मर्ढेकर संकर. तो सामावून घेऊन ही कविता त्यापलीकडे पोचते याचे कारण तिला ‘ स्वत्व ’ आहे. परंपरेला भिडून,

सामावून घेऊन एखादे कविमन कसे घडते, याचे जोगळेकरांची कविता हे एक लक्षणीय उदाहरण आहे.

स्त्री हे जोगळेकरांच्या अनेक कवितांचे केंद्र आहे. तिचा वेध कवीने मुख्यतः दोन प्रकारे घेतला आहे. कधी पुरुषाची दृष्टी तिचा ठाव घेते; कधी स्त्री स्वतःच एखादे मनोगत सांगते. यात पुन्हा दोन प्रकार आहेत. काही मनोगते रूपकप्रतिमांचा आश्रय घेतात, तर काहींत थेटपणा असतो. रूपकप्रतिमांतून सांगितलेल्या मनोगतांतून एखादी वेदना, एखादी भीती यांचा उच्चार होतो. या सगळ्यातून स्त्रीमनाचे, स्त्रीच्या आयुष्याचे प्रत्ययकारी चित्र आपल्या डोळ्यांसमोर उमटते. या चित्रनिर्मितीसाठी रेषा एकमेकींशी कशा अर्थपूर्णरीतीने जुळत जातात पहा : 'फुलदाणी', 'का हसतेस ?', 'संदर्भखुणा' या कवितांत, नातेसंबंधात निर्माण होऊ पाहणारा, सूक्ष्मपणे जाणवलेला दुरावा आहे; त्यासंबंधी खंत आहे, पण समंजस दृष्टिकोणही आहे. या कवितांतील पुरुषाला स्त्रीमनातील ज्या आंदोलनांची चाहूल लागते, त्यांच्याशी मिळत्या-जुळत्या अशा आणखी काही आंदोलनांना 'तुझ्याबद्दल ओसंडून बोलणारे...', 'मोर सज्जच असतात' 'वारसा' या कवितांत स्पर्श आहे; एखादा नवा भावतरंगही आहे. तुझ्याबद्दल लोक ओसंडून बोलतात, कारण त्यांना तुझ्याबद्दल पुष्कळ काही ठाऊक असते. त्यावर 'मी नुसती हसते, तुला संपूर्ण सामावून घेतल्यागत' येथेही दुरावाच आहे. त्यातील दुःख व उपरोध यांच्या छटा एकमेकीत मिसळून नाहीशा झाल्या आहेत. शेवटी उरतो तो एक अलिप्त आवाजात विचारलेला प्रश्न :

हे कळेल का कुणाला
फक्त तेवढेच माहीत आहे मला
तुझ्याबद्दल ?

'मोर सज्जच असतात' या कवितेत एका मानसिक दडपणाचे चित्र आहे. या दडपणाला अनेक संदर्भ आहेत; आणि त्यांतील एक 'तू'शी असलेले विशिष्ट नाते हाही आहे. 'वारसा' ही कविता स्त्रीवरील

सामाजिक दडपणांची कथा थेट शैलीत सांगते. ही दडपणे, बंधने, आईने मुलीवर म्हणजेच स्त्रीने स्त्रीवर लादलेली. पण ती स्वेच्छेने थोडीच लादलेली असतात ? नाइलाज असतो, दु:ख असते, थोडी चीडही असते :

मी जवळजवळ पुरं केलं होतं माझं ऐतिहासिक कर्तव्य
तुला एक जबाबदार भेकड स्त्री बनवण्याचं
माझा सांस्कृतिक वारसा तुझ्यापर्यंत पोचवण्याचं.

या कवितेत पुरुषावर असलेला रोख 'त्याची इच्छा 'मध्ये विलक्षण धारदार स्वरूपात प्रकट होतो. ही कविता स्त्रीची कुचंबणा किती वेगळ्या तऱ्हेने सांगते ! अशा रेषा जुळवत जुळवत आपण अखेर 'रंग' व 'डोंबाऱ्याचा खेळ' या कवितांपर्यंत पोचतो. चेहऱ्यावर रंग फासायचे, वेगवेगळ्या भूमिका वठवत राहायचे. शेवटी ते रंग सर्वस्वाचे शोषण करतात आणि जवळ उरते ते रिकामेपण, एकटेपण. आयुष्य ही एक कधीही न संपणारी कसरत. अनेक व्यवधाने सांभाळत, पुरुषाच्या वखवखलेल्या स्पर्शांना, नजरांना तोंड देत तोल सांभाळत राहायचे. सकाळपासून रात्रीपर्यंत ! कानात अखंडपणे घुमणारा तो डोंबाऱ्याच्या ढोलकीचा आवाज. कधी तोल गेल्याचा भास होतो. तो अनुभव अधिकच विदारक असतो. वाटते,

माझ्यावर तुटून पडतात शेकडो माणसांचे हात.
माझ्या अंगावर प्रचंड वजन
माझ्या तोंडून किंकाळीही फुटत नाही.

भास संपतो. कसरत चालूच राहते. पण हा भास तरी कसा ? तो येथे वास्तवाच्या पातळीवरच आहे. वाचकाला होणाऱ्या या जाणिवेसकट चित्र पूर्ण होते. ते थोडे उदास, थोडे सुन्न करणारे आहे.

हे चित्र पाहिल्यावर मनात येणारे काही प्रश्न असे : हे या दशकातील स्त्रीचे चित्र आहे का ? मला वाटते, आहे. एक तर यात स्त्रीचे उदात्तीकरण नाही. कधी 'काय हलाखी स्त्रीत्वाची ही !' असे उद्‌गार काढणाऱ्या किंवा 'निबरट, किरटी हाडबंडले अशा बायका' असे

वर्णन करणाऱ्या मर्ढेकरांनाही स्त्रीतील मातृत्वाचा साक्षात्कार झाल्यानंतर मस्तक खाली झुकवल्याखेरीज राहवले नाही. रेग्यांना स्त्री मुख्यत: प्रणयिनी, कामिनी याच स्वरूपामध्ये जाणवल्यामुळे हे लौकिक तपशील त्यांच्या कवितेत फारसे आलेच नाहीत. नंतरच्या कवितेत असे काही तपशील असले तरी स्त्रीभोवतीचे उदात्ततेचे वलय अजून अधूनमधून झळकतेच. नाहीतर मग एकदम दुसरे टोक ! म्हणजे अन्याय, त्याविरुद्ध बंड–निदान त्याला आव्हान वगैरे ! अशाप्रकारच्या कवितांशी जोगळेकरांच्या कवितेतील हे चित्र ताडून पाहिले तर ते कदाचित कालबाह्य वाटेल. स्त्रीमुक्ती-आंदोलनाच्या काळात असे चित्र रेखाटावे ? याही प्रश्नाला होकारार्थी उत्तर द्यावे लागेल. एकतर ते बंड वगैरे अजूनतरी कागदोपत्रीच आहे; आणि दुसरे असे की, ही जोगळेकरांनी पाहिलेली स्त्री आहे. हे टेबलच उलथून टाकता येईल, हे आपल्या मनातही येत नाही' या पिंडधर्माच्या जोगळेकरांनी पाहिलेली. त्यांच्या अवतीभवती तीच आहे त्याला ते तरी काय करणार ? जोगळेकरांच्या कवितेची मुळे महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय समाजात किती खोलवर गेलेली आहेत हे यावरून लक्षात येते. आता, या सगळ्या परिस्थितीबद्दल एक वेगळी प्रतिक्रियाही होऊ शकली असती. पण मग त्यासाठी स्वत:ची मुळे विसरण्याचा वा नाकारण्याचा द्राविडी प्राणायाम करावा लागला असता. जोगळेकरांनी तो मार्ग स्वीकारला नाही हे बरे झाले. 'टेबल उलथून देण्याची' भाषा बोलणारे पुष्कळ आहेत. दुर्दैवाने, पुष्कळ कवींच्या तोंडची ती भाषा पोकळ, बेजबाबदार वाटते. त्यामुळे काहीच निष्पन्न होत नाही. याउलट, आपल्या मर्यादेत राहून, जबाबदार भूमिकेवरून, जे आहे तेच दाखवत राहणे हे अधिक परिणामकारक ठरू शकते. वाचक त्यामुळे अधिक जागृत होतो. त्याला एक निराळे भान मिळते. तो कवीच्या मानसिक व्यापारात, प्रतिक्रियांत सहभागी होतो. त्या 'बडचा बंडवाल्यां'चा काळ मागे पडला की काय, अशी शंका येण्याइतकी आज तात्त्विक, पोकळ बंडाची भाषा माजली आहे. बंड तरी करायचे नाहीतर कुढत तरी बसायचे या आजच्या प्रवृत्ती. जोगळेकर या

दोन्ही प्रवृत्तींना वळी पडलेले नाहीत. आणखी एक प्रश्न : स्त्रीच्या या चित्रामागे सामाजिक जाणीव वगैरे कितपत ?– आहे; पण ती अस्पपष्ट, अप्रत्यक्ष. जोगळेकरांच्या प्रतिक्रियेत सामाजिक जाणिवेपेक्षा वैयक्तिक भावनेला अधिक प्राधान्य आहे. ते, ही भावना कवितेत चांगल्याप्रकारे संक्रमित करतात. भावविवश होत नाहीत, किंवा अति वैयक्तिकही राहत नाहीत. त्यांचे सगळेच नसलेतरी काही शब्द इतरांसाठी असतात. ते ऐकायचे की नाही हा निर्णय त्यांनी इतरांवर सोपवलेला असतो.

इतरांसाठी नसलेले असे जोगळेकरांच्या कवितेत काय आहे ? येथे त्यांच्या 'ती माझ्याकडे आली', 'काहीच आठवत नाही', 'कॅमेरे रोखलेले' या कवितांचा विचार करता येईल. भ्रांत मनःस्थितीत, जणू नेणिवेतच लिहिलेल्या या कविता आहेत. प्रत्येक कवितेत या ना त्या संदर्भात, या ना त्या प्रतिमेत, प्रेयसीची झपाटत राहिलेली आठवण आहे. 'काहीच आठवत नाही 'मध्ये तर त्या आठवणीभोवती मृत्यूच्या घिरट्या आहेत. अंतरायाचा अनुभव त्या टोकापाशी येऊन भिडला आहे. हे भास, दिवास्वप्ने, दुःस्वप्ने– हे सगळे फक्त जोगळेकरांचे आहे. कारण जाणिवेत इतरांना सहभागी करून घेता आले तरी नेणीव ही स्वतःचीच असते. तिचा स्वतःलाही धड थांग लागत नाही; मग इतरांना तेथे कोठून प्रवेश मिळणार ? जोगळेकरांच्या एकूण निर्मितीच्या संदर्भात या कवितांचे महत्त्व दोन प्रकारचे आहे : असा एखादा गुंतागुंतीचा अनुभवही ते त्यातील गुंता शक्य तेवढा कमी करून मांडतात. हा सरळपणा त्यांच्या सगळ्याच कवितांत आहे. इतर कवितांत आढळणारा दुसरा विशेष म्हणजे कवीचे स्वतःत बुडणे, हरवून जाणे. 'होड्या 'सारख्या कवितांत ते नादिष्टपणाच्या पातळीवर राहते, तर 'काहीच आठवत नाही 'सारख्या कवितांत ते भ्रमिष्टपणाच्या सीमेशी पोचते. जोगळेकरांच्या प्रेमकवितांचा सबंध पल्ला या दोन्ही प्रकारच्या कवितांतून स्वच्छपणे दिसतो. ती दिसावी कळावी हा उद्देश नाही. पण ती पारदर्शक असल्यामुळे अनाकलनीय, राहत नाही. याला जोगळेकरांचीही हरकत नसावी. कारण शब्दांचा

भूलभुलैय्या निर्माण करून, आपण काहीतरी गहन, अवघड सांगतो आहोत, असा भास निर्माण करणाऱ्यांपैकी ते नव्हेत. कदाचित, जोगळेकरांचे अनुभवच असे आहेत की त्यांतून शब्दांचा भूलभुलैय्या निर्माण करणेच अशक्य आहे. अखेर ही प्रेमकविताही ' टेबलच उलथून टाकता येईल ' हे ज्याच्या मनातही येत नाही अशा कवीची आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. ती जरा संकोची, अबोल अशीच राहणार– आणि म्हणूनच खास जोगळेकरांचीही.

जोगळेकरांच्या फक्त स्वतःसाठी असलेल्या अशा आणखी एका कवितासमूहाचाही येथे विचार केला पाहिजे. त्या निर्मितीप्रक्रिये-संबंधीच्या कविता आहेत; आणि आश्चर्य म्हणजे चित्रकाराच्या भाषेतल्या. जोगळेकरांना ' चित्रा 'विषयी वाटणारे आकर्षण असे पुष्कळ ठिकाणी जाणवते. ' अर्धे मिनिट ' या कवितेत ते एक चित्रच शब्दांतून रेखाटतात. ' चित्र ' या कवितेत त्यांची काव्यप्रकृती अचूक बोलून जाते. स्वतःच्या वहीत चित्र रेखाटून देणाऱ्या चित्रकाराला उद्देशून ते म्हणतात,

तुम्ही अचानक निघून गेलात
चित्रापलिकडे.
मी चित्राच्या अलिकडे, अध्याहृत.

ही काव्यप्रकृती ' तुझ्या चित्रातला गर्द निळा रंग ' या कवितेत अधिक नेमकेपणाने व्यक्त होते. त्यांना ठाऊक आहे की त्या गर्द निळ्या, जणू स्वतःचेच आकाश त्या रंगातून निर्माण केलेल्या चित्रात आपल्याला शिरता येणार नाही. त्या निर्मात्याचे हात ' अगदी स्वतःचे आहेत '– याउलट,

मी पाहतो
देत चालताना ठिपके
माझ्या पावलांचे जमिनीवर
अचूक मोजता येतील अशा अंतरांवर
माझ्या पोतडीत कसलेले रंग

आणि कितीतरी दूरपर्यंत माझ्या सांभाळून
ठेवलेल्या रेषा.

ही स्वतःला कलावंत म्हणून असलेल्या मर्यादांची प्रांजळ नोंद आहे. 'टेबलच उलथून टाकता येईल' असे ज्याच्या मनातही येत नाही; अशा कलावंताच्याच या मर्यादा आहेत. या संग्रहातील शेवटच्या 'कुठून येतात' या कवितेत 'अचानक तरीही अटळ' शब्द आपल्या पंखावरून आकाश घेऊन येतात.

मी भ्रमचित्त धुंडत रहातो दिशा
—ते आले जिकडून
...मी वेगळा करू शकत नाही मला
या दिशांपासून.
पंख फडफडून टाकले
की संपते का कविता तुझ्यापुरती ?
माझ्यासाठी ठेवून न संपणारे आकाश...

येथेही स्वतःच्या मर्यादांचे भान आहे. पुन्हा एकदा बालकवींचीच आठवण होते. त्यांनाही मर्यादा काचत होत्या. व्यक्तीच्या आयुष्याला मर्यादा पडल्या की त्या आपोआपच कलावंतालाही घेरतात हे त्यांना कळत होते. ती अपूर्णता त्यांना शोकाच्या डोहात बुडवून टाकत होती आणि तरीही ते 'खगबाळा'चे मनोहर 'चित्र' पाहत होते. तेही शब्दांपेक्षा रंगरेषांच्या भाषेतच अधिक बोलत होते. तेही 'भ्रमचित्त' होते .. अशी ही कविता बालकवींशी आणि जोगळेकरांच्या इतर कवितांशी जाऊन भिडते. मर्ढेकरही आठवतात. त्यांच्या प्रत्येक संग्रहातल्या पहिल्या व शेवटच्या कविता आठवतात. त्या जशा मर्ढेकर या कवीची उकल करतात, तशाच 'होड्या'मधील पहिली व शेवटली या दोन कविताही. मर्ढेकर आठवतात तसे रेगेही. चित्रकाराची शैली लाभलेले रेगे. कोणाच्या कवितेत तुटलेल्या पंखांमुळे आलेले 'विव्हल'पण, कोणाच्या कवितेत 'शिशिरर्तुच्या पुनरागमे', निराधार झालेली 'इवली सुकोमल पाखरे', कोणाच्या कवितेत

'दुसरा पक्षी'. जोगळेकरांच्या कवितेत या सगळयांची सरमिसळ झाली आहे. म्हणूनच म्हटले की ते जणू रेगे-मर्ढेकरांच्या युगात वाढलेले बालकवींचे मन आहे. त्या मनाने निसर्गाशी सहकंप पावण्याची शक्तीही जपून ठेवली आहे; हे 'कुर', 'जहाजे जेव्हा' या कवितांवरून प्रत्ययाला येते. या दशकातही ती शक्ती क्षीण का झाली नाही? कारण जोगळेकरांनी स्वत:तील निरागसपणाला जपले. हा निरागसपणा अनुभव घेण्याच्या शैलीत आहे. त्याप्रमाणे 'होडया' सारख्या प्रतिमेत, 'कुर', 'ठ्ठो', 'कट्टी' यांसारख्या कित्येक शब्दांतही आहे. खरे तर जोगळेकरांच्या एकंदर कवितेची भाषाच त्यांच्या बालभावाचे प्रतिबिंब दाखविणारी, प्रतिध्वनी उमटविणारी आहे.

मी सुरुवातीला प्रश्न उपस्थित केला होता की, 'जे कुणाला कळले नाही' ते वाचकांना कळते कसे? किती? काय?– काय कळते हे पाहिले. त्यामुळे 'किती?' या प्रश्नाचे उत्तर 'पुष्कळसे' असेच द्यावे लागते, आणि त्याबद्दल आनंद होतो. आता हे कसे कळते? याची दोन उत्तरे आहेत; एक तर ते कवीच्या बालभावामुळे कळते. लपवावेसे वाटले तरी लपवता येत नाही. स्वगताला सहजच संवादाचे रूप येते. दुसरे असे की ही स्वगते-संवाद चित्रकाराच्या शैलीतील आहेत. चित्र जसे दिसते, म्हणजेच तेवढया प्रमाणात रसिकाला सामोरे झालेले असते, तसेच त्या शैलीतील कवितांचेही आहे.

शेवटी पुन्हा एकदा 'होडया'मधील 'कुठून येतात' ही शेवटची कविता आठवते. 'कुठून येतात तुझ्या कवितेतले शब्द?' हा प्रश्न कोणाला उद्देशून आहे? दुसऱ्या एखाद्या कवीला की स्वत:लाच? खरे म्हणजे ते तेवढे निश्चित नाहीच.

दाट जंगल
झाडे एकमेकांत इतकी मिसळलेली
की समजत नाही कोणती फांदी
–तुझी, माझी किंवा कुणाचीच नसलेली.

प्रत्येक चांगला, प्रामाणिक कलावंत त्या फांदीच्या शोधात असतो. प्रत्येकाच्या तोंडी हा प्रश्न असतो, प्रत्येकाला मर्यादांचे भान असते. विशेष हे की जोगळेकरांनी ही भूमिका स्वतःवर रोख ठेवून मांडली आहे. तिचे ' साधारणीकरण ' करण्याचा आणि पर्यायाने स्वतःच्या मर्यादा लपवण्याचा प्रयत्न कुठेही केलेला नाही.

जो स्वतःच्या मर्यादा ओळखतो त्याला त्या इतरांनी दाखवून देणे गैरलागू ठरते. ' माझ्या पोतडीत कसलेले रंग आणि कितीतरी दूरपर्यंत माझ्या सांभाळून ठेवलेल्या रेषा ', ' मी चित्राच्या अलिकडे अध्याहृत ' हे जोगळेकरांना ठाऊक आहे– म्हणजेच शब्दांतून ओसंडून जाणारे असे सध्या तरी आपल्या जवळ काही नाही हे त्यांना ठाऊक आहे. ' टेबलच उलथून टाकता येईल ' असे त्यांच्या मनातही येत नाही, म्हणजेच आपल्याला आव्हाने देता येत नाहीत हेही त्यांना ठाऊक आहे.

पण एकदा हे कळले की आव्हाने घेता येऊ लागतात, चित्राच्या पलीकडे पोचण्याची धडपड चालू होते. मग ' जहाजे जेव्हा पाण्यात माझी वाट पाहत उभी होती ' असे भूतकाळात बोलण्याची गरज राहत नाही. ती जहाजे उभीच असतात. ज्याला ' पुष्कळ होड्या येतात ' त्या कवीसाठीही ती उभी आहेत. बालपणात व वाढाळू वयात मनात रुजलेली ही जहाजांची आठवण कवींच्या मनात पुन्हापुन्हा उसळेल आणि त्यासरशी त्याची कविताही आपल्या मर्यादांतून उसळी मारून त्याला नव्या वाटांवरून फिरायला नेईल.

जो स्वतःची लकेर घुमवत त्या दाट जंगलात आत्मविश्वासाने शिरला आहे त्याला कधी ना कधी स्वतःची फांदी सापडल्याखेरीज थोडीच राहील ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2४५९
दा. क्र. 23५९६
काव्य प्रा.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

१४–३–८२

REFBK-0023596

REFBK-0023596

Scan 10-5-18